महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.



नियामक मंडळाची २४ वी बैठक दि.०८.०३.२००१

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २४ वी बैठक दि.०८.०३.२००१ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २४/१

''ठराव करण्यात येतो की २३ व्या बैठकीमध्ये पारित केलेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २४/२

'' ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकारी समितीचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये खाली नमूद केलेल्या मुद्दा क्र. १ ते ७ प्रमाणे विहीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रकल्पांच्या कामांच्या प्राधान्यक्रमाबाबत परिस्थितीनुरुप शिफारस करणे.

२. नवीन रोखे मालीका, निधीची आवश्यकता, उभारण्याची कार्यपद्धती इ. बाबत शिफारस करणे.

३. नियामक मंडळासाठी विषयसूची निश्चित करणे.

४. कंत्राटदार निवडसूची पद्धतीमध्ये आवश्यकतेनुसार बदल सुचविणे.

५. विविध विभागांच्या दरसूची महामंडळामध्ये वापरण्याबाबत निर्णय घेणे.

६. नियामक मंडळ/अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक यांनी नेमलेल्या विविध तांत्रिक समितींच्या अंतिम अहवाल स्विकृतीबाबत महामंडळास शिफारस करणे.

७. वरील विषयांव्यतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक यांनी वेळोवेळी सुचविलेल्या विषयांबाबत अभ्यास करुन शिफारस करणे.''

ठराव क्र. २४/३

'' ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील ११ प्रकल्पांतर्गत 'ऊस' पीकक्षेत्राची दूरसंवेदन तंत्राने मोजणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत असलेल्या 'महाराष्ट्र सुदूर संवेदन सेवा केंद्र, नागपूर' संस्थेची नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून, या कामासाठी

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

सद्य:स्थितीत रु. ३० लक्ष निधी प्रथमत: उपलब्ध करुन देण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत. अभ्यासाच्या प्रगतीनुसार ह्या कामावरील पुढील खर्चाचा प्रस्ताव नियामक मंडळाकडे सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. २४/४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील प्रकल्पांमधून बिगर सिंचनासाठीचे प्रस्ताव मान्य करतांना, 'आरक्षणाची टक्केवारी विचारात न घेता बिगरसिंचन वापराच्या प्रमाणात भांडवली खर्चाचा हिस्सा संबंधित संस्थेकडून घेण्याच्या अटींवर, बिगरसिंचन मागण्या मान्य करण्यात याव्यात. भांडवली हिस्सा जमा झाल्यावरच संबंधित संस्थेशी करारनामा करण्यात यावा व तद्नंतरच योजना कार्यान्वित करण्यास परवानगी द्यावी.' असा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २४/५

''ठराव करण्यात येतो की, मालिका २०००/अ मार्फत उभालेल्या निधीचा विनियोगासंदर्भात शासनाने क्र. कृखोवि/१०००/१८८३/(८३०७/२०००)/जसंनि दि.५.२.२००१ च्या पत्राने मान्यता दिलेल्या प्रस्तावावर केलेल्या/करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.''

ठराव क्र. २४/६

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम १९९६ मधील तरतुदींनुसार वित्तीय कामकाजाबाबतच्या विषयासंदर्भात परिशिष्ट क्र.३ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांना स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविल्यानुसार वित्तीय प्राधिकार प्रदान करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २४/७

''ठराव करण्यात येतो की,

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कर्मचारी राज्य शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविले असल्याने, या कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याच्या निर्णयास व त्यासाठी झालेल्या रु.४६.७७ कोटींच्या खर्चास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या नियमांनुसार वेतन, महागाईभत्ता, प्रवास भत्ता, वाहतूक भत्ता, घरभाडे भत्ता इ. भत्ते, महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

३. उपरोक्त निर्णय क्र.१ व २ राज्य शासनास पाठविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २४/८

''ठराव करण्यात येतो की, कऱ्हाड येथील सिटी सर्व्हे क्र. १९२ मधील, महामंडळाच्या ताब्यातील जागेवरील अतिक्रमणे तावडतोब हटवण्याच्या व या जागेसाठी दगडी संरक्षक भिंत उभारण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २४/९

''ठराव करण्यात येतो की, रु. २०,००० च्या वरील वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्यापूर्वी सदर देयके प्रमाणित करण्यासाठी मंजूर ठराव क्र. १६/४ नुसार नेमण्यात आलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची समिती बरखास्त करण्यात यावी व ठराव क्र. १६/४ रद्द करण्यात यावा. शासन पत्र क्र. १३००/५८१(१८२/२०००)/आ(क्षेप्र) दि. ३१.८.२००० मधील सूचनांप्रमाणे रु. २०,००० वरील देयके विहीत पद्धतीचा अवलंब करुन, शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत. शासनाने मान्यता दिल्यावर सदर देयके अदा करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र.२४/१०

''ठराव करण्यात येतो की, महामंडळातील नवनियुक्त दोन उपाध्यक्षांसाठी वाहन व्यवस्था पुरविण्याबाबतची महामंडळातील वाहन उपलब्धता लक्षात घेता मा. उपाध्यक्ष यांनी त्यांचे स्वत:चे वाहन महामंडळाच्या कामासाठी वापरण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच स्वत:चे वाहन वापरण्यासाठी अनुज्ञेय असलेल्या शासन निर्णय क्र. शासाठ१०९७/प्रक्र१२/९७/साऊ दि.१.१२.२००० अन्वये निर्गमित केलेल्या तरतुदीं या, उपाध्यक्ष, महामंडळ पदासाठीचा कार्यभार लक्षात घेता पुरेशा नसल्याने त्यांना स्वत:चे वाहन वापरण्यासाठी अनुज्ञेय होणारी रक्कम ही मा. मुख्य सचिव ह्यांचेबरोबर सचिव (पा), सचिव (वित्त) व सचिव (नियोजन) ह्यांनी चर्चा करुन निश्चित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. वरीलप्रमाणे अनुज्ञेय होणारी मासिक रक्कम पुढील नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात यावी.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 24.doc

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.



ठराव क्र.२४/११

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातील धरणांमधून विविध नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका यांना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या अनुषंगाने महामंडळातील मोठ्या प्रमाणावर थकीत पाणीपट्टी विचारात घेता ही वसुली परिणामकारक होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. महामंडळाचे पिण्याचे पाण्यासाठी संबंधित स्थानिक संस्था यांना दिलेले पाणी व त्याचे अपेक्षित पाणीपट्टी व प्रलंबित पाणीपट्टी याची माहिती स्थानिक वृत्तपत्रातील बातम्यांच्या माध्यमातून प्रसृत करण्यात यावी.

२. या माहितीमध्ये पाटबंधारे विभागाने या पाण्यासाठी आकारलेले दर व स्थानिक स्वराज्य संस्थेने नागरिकांकडून याच पाण्यावर करण्यात येणारी पाणीपट्टी आकारणी याचा समावेश करण्यात यावा.

३. प्रदीर्घ कालावधीपासून थकीत पाणीपट्टीच्या वसुलीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे पाणीपुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, याची वृत्तपत्रात जनतेच्या माहितीसाठी पूर्वसूचना देण्यात यावी.

४. संबंधित स्थानिक संस्थांचा पाणीपुरवठा क्रमाक्रमाने खंडीत करण्यात यावा, जेणेकरुन थकीत पाणीपट्टी वसूल करणे शक्य होईल."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 24.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## परिशिष्ट क्रमांक - ३

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम १९९६ मधील तरतुदींनुसार वित्त विषयक कामकाजासंबंधी अधिकाऱ्यांना वित्तीय शक्तीचे प्रदान.

| अ. क्र. | विषय | प्राधिकृत अधिकारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | बँकेमधे अकौंट उघडणे/बंद करणे | व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक/वित्त सदस्य | |
| २ | मंडळ/विभागीय पातळीवर धनादेशावर स्वाक्षरी करणे. | कार्यकारी अभियंता/सहाय्यक अधीक्षक अभियंता/विभागीय लेखा अधिकारी/विभागीय लेखापाल- संयुक्तपणे. | शासन परिपत्रक क्र.डीपीडब्लू-११९१/७४१३४/सी.आर.-२०४, दिनांक २५-३-९२ मधील तरतुदींनुसार. |
| ३ | मंडळ/विभाग कार्यालयांना तसेच संबंधीत बँकांना निधी वितरणासंबंधी द्यावयाच्या प्राधिकार पत्रावर स्वाक्षरी करणे. | १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अनुपस्थितीमध्ये वरिष्ठ लेखा अधिकारी | वित्त सदस्य आणि कार्यकारी संचालक यांचे मान्यतेने. |
| ४ | गुंतवणूकदारांना द्यावयाच्या व्याजासंबंधी धनादेशांवर स्वाक्षरी करणे. | १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अनुपस्थितीमध्ये वरिष्ठ लेखा अधिकारी | वित्त सदस्य आणि कार्यकारी संचालक यांचे मान्यतेने. |
| ५ | विशेष बाबींच्या अर्थविषयक कागदपत्रांवर (उदा.बिल डिस्काऊंटींग योजने अंतर्गत वचन चिठ्ठी, हुंडी वगैरे) स्वाक्षरी करणे. | १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>२. वरिष्ठ लेखा अधिकारी | वित्त सदस्य आणि कार्यकारी संचालक यांचे मान्यतेने. |
| ६ | महामंडळाकडील शिल्लक रकमेची शासन, वित्त विभाग क्र.पी.एस.यू.-११९५/सी आर-३/पी.एस.क्यू. दिनांक ६-१०-९५ व दिनांक १०-१०-९६ अंतर्गत तरतुदींनुसार गुंतवणूक करणे. | १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी | वित्त सदस्य आणि कार्यकारी संचालक यांचे मान्यतेने. |
| ७ | मासिक लेखा स्वाक्षांकित करणे.<br>अ) विभाग कार्यालय.<br>ब) मंडळ कार्यालय<br>क) मुख्य अभियंता कार्यालय.<br>ड) महामंडळ कार्यालय | कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल/विभागीय लेखा अधिकारी<br>अधीक्षक अभियंता<br>मुख्य अभियंता<br>कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल/विभागीय लेखा अधिकारी | |

प्रा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 24.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ८ | वार्षिक ताळेबंदावर स्वाक्षरी करणे. | अध्यक्ष, व्यवस्थापकिय संचालक, कार्यकारी संचालक व मुख्य लेखा व वित्त अधिकारी | |
| ९ | रोख वहीवर स्वाक्षरी करणे.<br>अ) विभाग कार्यालय<br>ब) मंडळ कार्यालय<br>क) मुख्य अभियंता कार्यालय<br>ड) महामंडळ कार्यालय<br><br>इ) महामंडळांतर्गत ऑपरेशन अकौंट व कलेक्शन अकौंट | <br>कार्यकारी अभियंता<br>सहाय्यक अधीक्षक अभियंता<br>सहाय्यक मुख्य अभियंता<br>कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल/विभागीय लेखा अधिकारी<br>महामंडळातील लेखा अधिकारी | |
| १० | तिजोरीच्या दुय्यम (डुप्लिकेट) चाव्या सुरक्षा कक्षात ठेवण्याबाबत.<br>अ) विभाग कार्यालय<br>ब) मंडळ कार्यालय<br>क) मुख्य अभियंता कार्यालय<br>ड) महामंडळ कार्यालय | <br><br>संबंधित विभागाचे अधीक्षक अभियंता<br>संबंधित मुख्य अभियंता<br>महामंडळाचे मुख्य अभियंता<br>महामंडळाचे मुख्य अभियंता | |
| ११ | अंतर्गत लेखा परिक्षण अहवालांचे तसेच भारतांचे महानियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांच्या तपासणी अहवालाचे (Inspection Report) अनुपालन<br>अ) विभाग कार्यालय<br>ब) मंडळ कार्यालय<br>क) मुख्य अभियंता कार्यालय<br>ड) महामंडळ कार्यालय<br><br><br>इ) भारतांचे महानियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांचे लेखा परिक्षण अहवाल, ड्राफ्ट पॅरा व स्वतंत्र लेखा परिक्षा अहवाल यांचे अनुपालन<br>फ) लोक लेखा समिती / अंदाजपत्रक समिती यांचे पुढे येणारे लेखा परिच्छेद अहवालांचे अनुपालन | <br><br><br><br>कार्यकारी अभियंता<br>अधीक्षक अभियंता<br>मुख्य अभियंता<br>व्यवस्थापकीय संचालक<br><br><br>व्यवस्थापकीय संचालक<br><br><br><br>व्यवस्थापकीय संचालक | <br><br><br><br><br><br><br>कार्यकारी संचालक, वित्त सदस्य व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत.<br>कार्यकारी संचालक, वित्त सदस्य व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत.<br><br>कार्यकारी संचालक, वित्त सदस्य व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत. |
| १२ | अल्पमुदत कर्ज व ओव्हरड्राफ्ट परतफेड (मुद्दल व व्याज) | अध्यक्ष | व्यवस्थापकिय संचालक, कार्यकारी संचालक, वित्त सदस्य व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत. |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 24.doc